सकाळ | eSakal.com
Published on सकाळ (http://www.esakal.com)

# 'सायन्स स्टार्ट अप्स'मध्ये महिलांची आघाडी

- सलील उरुणकर

मंगळवार, 24 मे 2016 - 12:45 AM IST

**Share Link:** http://www.esakal.com/Tiny.aspx?K=r7ECUx

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील 'व्हेंचर सेंटर'ला नुकतेच सर्वोत्कृष्ट 'टेक्नॉलॉजी बिझनेस इनक्युबेशन'साठी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सेंटरमध्ये काम करणाऱ्यांमध्ये ८० टक्के महिला आहेत, तर व्हेंचर सेंटरच्या मदतीने स्थापन झालेल्या 'स्टार्ट-अप्स'च्या संस्थापक नवउद्योजकांपैकी ३० टक्के महिला आहेत. सायन्स 'स्टार्ट अप्स' आणि व्हेंचर सेंटरमध्ये काय चालते याविषयी सेंटरच्या महाव्यवस्थापक डॉ. मनीषा प्रेमनाथ यांनी 'सकाळ'ला माहिती दिली.



'व्हेंचर सेंटर' टीमचे सदस्य.

स्टार्ट अप म्हणजे आयटी किंवा ई-कॉमर्सशी संबंधित काहीतरी अशी ओळख निर्माण झाली आहे. ऑनलाइन सेवा पुरविणाऱ्या वेगवेगळ्या कंपन्यांच्या जाहिरातींच्या भडिमारापुढे अन्य क्षेत्रांतही, विशेषतः मूलभूत विज्ञानासारख्या विषयात नवीन तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या स्टार्ट अप्स असू शकतात, हे ठळकपणे दिसत नाही. झटपट प्रॉडक्ट लॉँच आणि दोन ते तीन वर्षांत कोट्यवधींची उलाढाल ही आयटी स्टार्ट अप्सची बाजू, तर बाजाराच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहून अपार कष्ट घेत नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान विकसित करणे, ही सायन्स स्टार्ट अप्सची बाजू.

### व्हेंचर सेंटर ः स्थापना व उद्देश

पुण्याच्या पाषाण भागात असलेल्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या (एनसीएल) इनोव्हेशन पार्कच्या जागेमध्ये 'व्हेंचर सेंटर' हे टेक्नॉलॉजी बिझनेस इनक्युबेटर आहे. 'नॉट फॉर प्रॉफिट' तत्त्वावर २००८मध्ये हे सेंटर सुरू झाले. एनसीएल ही त्याची पालक संस्था आहे. संशोधन कल्पनांचे रूपांतर तंत्रज्ञानाधारित स्टार्ट अप्समध्ये करून विज्ञानाच्या क्षेत्रातील नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्याचा सेंटरचा उद्देश आहे. त्यातही काळाच्या पुढचे नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी व्हेंचर सेंटर प्रयत्नशील आहे.

संशोधन व्यक्तिगत पातळीवरील, तर उद्योजकता सांघिक यश असते. नवउद्योजक बनायचे असल्यास संशोधकांप्रमाणे स्वतःपुरता विचार करून चालत नाही. आपल्या देशामध्ये होणाऱ्या संशोधनकार्यांपैकी ८० टक्के काम सरकारी निधीवर चालणाऱ्या संस्थांमध्ये होते, त्यामुळे या संशोधनाचा फायदा नागरिक, उद्योगविश्‍वाला करून द्यायचा असल्यास 'व्हेंचर सेंटर'सारख्या उपक्रमांची गरज कायम भासणार आहे.

**स्टार्ट अपची निवड**

आधीच्या धोरणानुसार कोणत्याही स्टार्ट अप किंवा कंपनीमध्ये शास्त्रज्ञांना समभाग (इक्विटी) घेण्यास मनाई होती; मात्र २००९पासून हे धोरण बदलले आणि स्टार्ट अप्समध्ये शास्त्रज्ञांचा सहभाग वाढू लागला.
एनसीएलच्या 'लॅब टू मार्केट' (एल२एम) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत प्रयोगशाळेतील संशोधनाचे बाजारमूल्य शोधण्याचा प्रयत्न होऊ लागला.

व्हेंचर सेंटरच्या टीमने एनसीएलपासून सुरवात केली आणि तेथील संशोधकांमधून 'आयडिया स्कॅनिंग' सुरू केले. प्रयोगशाळेत यशस्वी ठरलेल्या प्रत्येक संकल्पनेची निवड न करता तंत्रज्ञान म्हणून यशस्वी ठरतील अशा काही संकल्पनांची निवड करण्यात आली. या प्रक्रियेला 'स्टार्ट अप न्यूक्लिएशन' असे संबोधले गेले. अशा प्रकारे पहिल्या टप्प्यात १० स्टार्ट अप्स सुरू करण्यात आले. व्यावसायिक कारणांसाठी अमेरिका, युरोपमधील कंपन्यांचा परवाना असलेले तंत्रज्ञान वापरण्याऐवजी स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करण्याचे या स्टार्ट अप्सचे लक्ष्य आहे.

व्हेंचर सेंटरमधील स्टार्ट अप्सला सीड, व्हेंचर कॅपिटल, एंजल इन्व्हेस्टमेंट आणि आंतरराष्ट्रीय सामाजिक संस्थांकडून अर्थसाह्य मिळाले आहे. गुंतवणूक मोठी आणि दीर्घकाळ चालणारी गोष्ट आहे. आयटी स्टार्ट अपसारखे सायन्स स्टार्ट अपला दोन वर्षांत यश नाही मिळाले, तरी नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान (स्वदेशी टेक्नॉलॉजी) विकसित झाल्यावर त्याची बाजारपेठ भारताबरोबरच संपूर्ण जग असेल.

**'नेटवर्क'चे फायदे**

व्हेंचर सेंटरने एनसीएल या पालक संस्थेसह इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, एज्युकेशन अँड रिसर्च (आयसर), आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूट, नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस (एनसीसीएस), नॅशनल एड्स रिसर्च इन्स्टिट्यूट (नारी), डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ आर्मामेंट टेक्नॉलॉजी (डीआयएटी), नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजी (एनआयव्ही), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मायक्रोबायोलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, हेल्थ सायन्सेस, केमिस्ट्री, झुलॉजी अशा विविध विभागांबरोबर, तसेच भारती विद्यापीठ स्कूल ऑफ बायोटेक्नॉलॉजी, डी. वाय. पाटील डेंटल कॉलेज यांना संलग्न करून घेतले आहे.

शास्त्रज्ञांबरोबर चर्चा, विविध विषयांवरील कार्यशाळा, नवउद्योजकता कल चाचणी असे अनेक उपक्रम व्हेंचर सेंटरने सुरू केले आहेत. 'नेटवर्किंग'च्या प्रक्रियेदरम्यान आघारकर संस्थेतील एका 'पीएच.डी.'च्या विद्यार्थ्याने नुकतीच स्वतःची स्टार्ट अप सुरू केली व ती व्हेंचर सेंटरने इनक्युबेट केली आहे.
संशोधन संस्था, सल्लागार तज्ज्ञ आणि मार्गदर्शक अशा एकूण १८० व्यक्ती, संस्थांचा समावेश व्हेंचर सेंटरच्या नेटवर्कमध्ये आहे. नावीन्यपूर्ण आणि बाजारात व्यावसायिक दृष्टीने यशस्वी होतील अशा संकल्पनांवर काम करणाऱ्या ३५ स्टार्ट अप सेंटरमध्ये सध्या कार्यरत आहेत. त्यांचे संस्थापक, मेंटॉर पीएच.डी., एम.टेक. असे उच्च शिक्षण घेतलेले; तसेच अमेरिका, युरोपमध्ये प्रशिक्षण घेतलेले आहेत. कर सल्लागारांपासून कायदेतज्ज्ञ

अशा वेगवेगळ्या विषयांच्या मार्गदर्शनासाठी तज्ज्ञ उपलब्ध आहेत. सोबत सक्षम तंत्रज्ञांची साथ मिळाल्यामुळे 'स्टार्ट अप इकोसिस्टिम' तयार झाली आहे.

**महिला 'आघाडी'**

व्हेंचर सेंटरमध्ये सुरू झालेल्या स्टार्ट अप्सपैकी ३० टक्के नवउद्योजक महिला आहेत; पण स्टार्ट अप्सची निवड करताना महिलांसाठी वेगळे निकष ठेवले नव्हते. संकल्पनांचा दर्जा आणि तंत्रज्ञानाचे संभाव्य बाजारमूल्य एवढ्या दोनच गोष्टी पाहून स्टार्ट अप्सची निवड करण्यात आली. व्हेंचर सेंटरमध्येच काम करणाऱ्यांपैकी ८० टक्के महिला असल्यामुळेही नवउद्योजक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या महिलांनाही प्रेरणा मिळाली आहे.

सेंटरमधील स्टार्ट अप्स प्रामुख्याने 'सायन्स-टेक्नो' क्षेत्रातील आहेत. त्यात बायोमेडिकल डिव्हायसेस इम्प्लांट्स (सिल्क फायब्रॉईड इम्प्लांट, पॉलिमर बेस्ड बायोमेडिकल इम्प्लांट, टी बी ड्रग्स), प्रायमरी अँड सेकंडरी ग्रिकल्चर (प्लॅन्ट व्हॅक्सिन डेव्हलपमेंट, बायोफर्टिलायझर्स, पेस्टिसाइड्स), फार्मास्युटिकल्स (ड्रग डिस्कव्हरी, व्हॅक्सिन प्लॅटफॉर्म), क्लिन एनर्जी एन्व्हायर्न्मेंट (ऑर्गेनिक किचन बेस्ड बायोगॅस), इंजिनिअरिंग अँड इलेक्ट्रॉनिक्स, आयटी हेल्थकेअर, मटेरिअल सायन्स या क्षेत्रांचा समावेश आहे.

**सायन्स स्टार्ट अप सुरू करायचाय?**

विद्यार्थी, संशोधक अशा कोणाकडेही 'स्टार्ट अप'ची, विशेषतः कोअर सायन्स अँड टेक्नॉलॉजीमधील संकल्पना असल्यास त्यांनी व्हेंचर सेंटरशी थेट ०२०- ६४०११०२६ या क्रमांकावर संपर्क साधावा. अशा सर्व इच्छुकांना पायाभूत व मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. पुण्यातल्या अन्य स्टार्ट अप्सलाही व्हेंचर सेंटरचे कॅम्पस कायम खुले आहे. विज्ञानाशी किंवा सेंटरमध्ये सुरू असलेल्या कामांशी निगडित असलेल्या स्टार्ट अप्स किंवा व्यक्तींना सर्व सोयीसुविधा मोफतसुद्धा उपलब्ध होऊ शकतात. विविध संशोधन संस्था, कंपन्या, संशोधक यांचे 'नेटवर्क' तयार करण्यासाठी या सुविधा देण्यात येतात.

7 0

© eSakal.com, all rights reserved